वाशिम जिल्हा पोलीस

# वाशिम जिल्हा डायल ११२ प्रकल्पामध्ये महाराष्ट्रातून अव्वल
# (प्रतिसाद वेळ – १५ मिनिटे ४८ सेकंद)

१) मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश **क्र.पोमसं क्र./संगणक कक्ष/डायल ११२ – MERS/२००/२०२१, मुंबई दि.०२/०९/२०२१** नुसार डायल – ११२ प्रकल्प दि.०४/०९/२०२१ रोजीपासून टप्प्या टप्प्याने कार्यान्वित करण्याचे निश्चित करण्यात आले असून संबंधित आदेशात सदर प्रकल्प कार्यान्वित करण्याचे सविस्तर वेळापत्रक व तपशील सोबत नमूद आहेत. वर नमूद आदेशानुसार **दि.१६/०९/२०२१ रोजीपासून डायल ११२ – MERS हा प्रकल्प वाशिम जिल्ह्यात कार्यान्वित** करण्यात आला आहे.

२) **डायल ११२ प्रकल्प राबवितांना पिडितांना संकटकाळी कमीत कमी वेळेत मदत पोहोचविण्यामध्ये वाशिम जिल्हा महाराष्ट्रातील इतर सर्व जिल्हे व आयुक्तालयांच्या (मुंबई वगळता) प्रतिसाद वेळेच्या तुलनेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे.** (मुंबई येथे सध्या १०० क्रमांकाचा वापर करण्यात येत असल्याने मुंबई या यादीतून वगळण्यात आले आहे.)

३) **मा.ना.श्री.शंभुराजे देसाई साहेब, गृहराज्यमंत्री तथा पालकमंत्री, वाशिम जिल्हा** व **मा.पोलीस अधिक्षक, वाशिम श्री.बच्चन सिंह (भापोसे)** यांच्या मार्गदर्शनाखाली MERS डायल ११२ हा प्रकल्प यशस्वीरित्या राबवुन पिडीत व्यक्तीला संकटकाळी कमीत कमी वेळेत मदत पोहचवण्याचे काम वाशिम पोलीस दल योग्यरित्या पार पाडत आहे.

४) डायल ११२ वर प्राप्त होणाऱ्या तक्रारींना प्रतिसाद देण्यासाठी **२१ दुचाकी व २४ चारचाकी** वाहने कार्यान्वित असून त्यात अजून ०४ नवीन वाहनांची भर पडली आहे.

५) वाशिम जिल्ह्याचा **प्रतिसाद वेळ हा सर्वात कमी १५ मिनिटे ४८ सेकंद** एवढा आहे.

६) डायल ११२ प्रकल्प प्रभावीपणे राबविण्याकरिता **०६ पोलीस अधिकारी, २६२ प्रतीसाद कर्ता व १० डिस्पॅचर** असा प्रशिक्षीत स्टॉफ कार्यरत आहे.

७) डायल ११२ अंतर्गत आतापर्यंत **३०२९ कॉल** MDT वर पाठवण्यात आलेले असुन त्यापैंकी **३०१८ कॉल** MDT द्वारे पुर्ण केलेले आहेत. MDT द्वारे कॉल पुर्ण करण्याचे वाशिम जिल्ह्याचे **प्रमाण ९९.६४%** आहे.

८) माहे – सप्टेंबर, २०२१ मध्ये डायल ११२ प्रकल्पाची सुरवात झाली होती तेव्हा वाशिम घटकाचा पिडीतांना प्रतिसाद देण्याचा कालावधी हा **२५ मिनीटे १० सेकंदाचा** होता त्यामध्ये सुधारणा करुन तो माहे – मे, 2022 मध्ये **१० मिनीटे ४३ सेकंदापर्यत** कमी करण्यात आलेला आहे. म्हणजेच प्रतिसादाची वेळ हि **५८ %** ने कमी करण्यात आलेली आहे.

९) डायल ११२ वर प्राप्त होणाऱ्या तक्रारींपैकी **सर्वात जास्त तक्रारी** ह्या

**१) महिलांसबंधी गुन्हे – ८०८ २) क्राईम – ६७८**

**३) चौकशी – ५११ आणि ४) अपघात – २७०**

असे प्राप्त झालेले आहेत.

१०)डायल ११२ वर प्राप्त होणाऱ्या तक्रारींपैकी **सर्वात जास्त तक्रारी** प्राप्त होणारे पोलीस स्टेशन

**१) पो.स्टे.वाशिम शहर – ५३५ २) पो.स्टे.रिसोड – ३७५**

**३) पो.स्टे.मालेगाव – ३२२ आणि ४) पो.स्टे.मंगरूळपीर – २९३**

इतक्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

११) **भविष्यात डायल ११२ ची प्रतिसादाची वेळ १० मिनिटांपेक्षा कमी करण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील आहोत.**

# वाशिम जिल्हा पोलीस दल

## #सक्षम #सतर्क #सुरक्षित